आधी टपरी आणि आता 'वल्ली'!

दिग्दर्शक मनोज शिंदे यांनी उलगडली चित्रपट निर्मितीची कथा

पुणे, दि. २४ जानेवारी २०२४ : “आधी टपरी चालवली आणि नंतर ‘आयटी’ क्षेत्रामध्ये दुकान चालवले शेवटी मला दुकान चालवायचा कंटाळा आला होता. नवीन काहीतरी करण्याचा विचार सुरू होता आणि डोक्यात जोगत्यांची कथा घोळत होती, त्यातून ‘वल्ली’ चित्रपटाची निर्मिती झाली”, दिग्दर्शक मनोज शिंदे चित्रपट निर्मितीची कथा सांगत होते.

पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात (पिफ) आज ‘वल्ली’ हा चित्रपट प्रदर्शीत झाला त्यानंतर शिंदे बोलत होते.

"लहानपणी वडील गेले, फटाके विकून आईने मोठे केले मग दुकानात काम केले पण त्याचा कंटाळा आला आणि शिक्षणाला लातूरला गेलो. आधी इंजिनियरिंग, एम.बी.ए. आणि लॉ मग ‘आयटी’मध्ये नोकरी केली. लहानपणी दुकानात काम करायचो दिवस रात्र, आता नोकरीही तशीच १२-१६ तास होत होती. नको होते हे, सोडली नोकरी आणि हवे ते करायचे ठरवले. लिहायला सुरुवात केली, आधी कविता आणि नंतर कादंबरी लिहिली. पुस्तकंसुद्धा प्रकाशित झाली पण मला व्यक्त होण्याचे समाधान हॉट नव्हते. मग चित्रपट करायचे ठरवले." असे शिंदे यांनी सांगितले.

शिंदे म्हणाले, "सिनेमाची कथा मी आधी कादंबरीच्या स्वरूपात मांडली होती. लहानपणापासून मी जोगते बघत आलेलो आणि त्यांच्या आयुष्याचे रंग मला फार भावायचे. त्याच्यावर मला सिनेमा करावेसे वाटले. मी बऱ्याच निर्मात्यांना ही कथा ऐकवली पण कोणीच तयार होईना. मग मीच निर्माता झालो. इकडे- तिकडे लोकांना भेटत असताना मी टीम जमवली. वल्लीची अख्खी टीम पाहिल्यांदाच काम करीत होती. या टीमच्या जीवावर, आणि एका ‘डीएसएलआर’वर आम्ही ‘वल्ली’ पूर्ण केला. सगळ्यांनी हा सिनेमा होण्यासाठी मनापासून कष्ट घेतले म्हणूनच सिनेमाला हे यश मिळत आहे.”

'वल्ली' हा चित्रपट एका जोगत्याची कथा आपल्यासमोर मांडतो. हा सिनेमा ‘वल्ली’ या पात्राभोवती फिरतो. स्त्रीच्या वेशात त्याचं पुरुषत्व कैद करत ‘वल्ली’ त्याच्या मनाविरुद्ध जोगत्याचं आयुष्य जगत असतो. त्याला या प्रवासात फार प्रमाणात शारीरिक आणि मानसिक त्रास दिला जातो. जोगता परंपरेतून सुटण्यासाठी तो झटत असतो. स्वतःच्या शोधात तो सामान्य आयुष्य जगण्याच्या प्रवासाला सुरुवात करतो. 'वल्ली' आपल्याला या प्रवासात सोबत घेऊन जातो.

महाराष्ट्राच्या जोगता परंपरेवर आधारित चित्रपटाचा सिंगापूर आतंरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात आंतरराष्ट्रीय प्रीमियर झाला. वल्लीचा ब्रह्मपुत्रा महोत्सवात राष्ट्रीय प्रीमियर झाला आणि अजिंठा महोत्सवात बक्षिसे देखील पटकावली. अशी सफर करत 'वल्ली' ‘पिफ’मध्ये मराठी स्पर्धा विभागात सादर झाला.